

**Dr. Sanjeev Dole**
**M.D. (Homeopathy)**
**Phone No : 24463649**
**Email ID : sanjeevdole@hotmail.com**

# सर्दी (सायनुसायटिस )



नाकाच्या शेजारच्या हाडांतील पोकळ्यांना सुज येणे किंवा जंतुसंसर्ग होणे म्हणजे सायनुसायटिस होय. 'सायनस' म्हणजे डोक्याच्या कवटीतील हवेच्या पोकळ्या. यांना नाकाच्या शेजारच्या हाडांतील पोकळ्या म्हणजेच 'पॅरा-नॉझल सायनस' असेही म्हणतात कारण या नाकाच्या भोवती स्थित असतात.

## ❖ सायनुसायटिसचे प्रकारः

### १. सर्दी साठलेल्या ठिकाणांवरुन

- फ्रंटल-डोळ्यांच्या वर भुवयांमध्ये
- मॅक्झीलरी-दोन्ही गालांमध्ये
- इथमॉईड-नाकाच्या बुंध्याच्या मागे आणि दोन्ही डोळ्यांच्या मध्ये
- स्फिनॉइड-नाकाच्या वरच्या भागात व डोळ्यांमध्ये

### २. सर्दीच्या कालावधीनुसार

- कधीतरी होणारी सर्दी (Acute)- साधारण ४ आठवड्यांपेक्षा कमी दिवस टिकते.
- जुनाट सर्दी (Chronic)- साधारण १२ आठवड्यांपेक्षा किंवा जास्त दिवस टिकते.
- वारंवार / नेहमी होणारी सर्दी (Recurrent)

## ❖ सर्दीची सर्वसाधारण कारणेः-

- जंतुसंसर्ग - बुरशी, जिवाणू, विषाणू
- सारखे अतिप्रमाणात नाक शिंकरणे
- लहान मुलांमध्ये-नाकामध्ये बाहेरचे काहीतरी अडकणे
- संसर्गजन्यता (ॲलर्जी)-यामध्ये धूळ, गार हवा, विशिष्ट वास, अत्तराचे वास इ.चा समावेश होतो.
- काही विशिष्ट औषधांचे दुष्परिणाम

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a Prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

❖ **सर्दीची लक्षणेः-**

- नाक चोंदणे
- नाकातुन साधारणपणे पिवळा किंवा हिरवा घट्ट शेंबूड बाहेर येणे
- घट्ट शेंबूड घशामध्ये उतरणे
- शिंका येणे
- नाक चोंदल्यामुळे श्वास घ्यायला त्रास होणे
- डोकेदुखी
- दातदुखी
- खोकला बडक्याचा किंवा बडक्याशिवाय (कोरडा)
- तोंडाचा घाण वास येणे
- ताप
- थकवा/अशक्तपणा
- तोंडाची चव कमी होणे
- वासाची संवेदना कमी होणे
- हाडातील पोकळ्यांच्या ठिकाणी दुखणे



❖ **निदानः-**

- या रुग्णांमध्ये नाकाच्या हाडातील पोकळ्यांच्या ठिकाणी दाबले असता दुखते.
- क्ष किरण तपासणी (x-ray) - हाडातील पोकळ्यांचा x-ray काढला असता सुज दिसते.
- CT Scan - यामुळे नाकाचे हाड एका बाजूस तिरके झाले आहे का म्हणजेच Deviated Nasal /Septum हे तपासता येते.

❖ **होमिओपॅथिक दृष्टीकोनः-**



जुनाट सर्दीसाठी होमिओपॅथिक औषधे हे एक वरदानच आहे.
सर्दीची कारणे जर काही पदार्थ, वास, गार हवा ही असतील तर ती टाळण्यापेक्षा त्याला उपयोगी अशी रोगप्रतिकारक शक्ती औषधाने निर्माण करणे व सर्दी समूळ नष्ट करणे हीच होमिओपॅथिची उद्दिष्टये आहेत.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a Prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

प्रत्येक वेळी Anti-Allergic गोळ्या घेण्यापेक्षा होमिओपॅथिक औषधाने अशी सर्दी पूर्ण बरी झाल्याचे बरेच दाखले आहेत.
तसेच नाकाचे वाढलेले हाड यासाठीसुद्धा ऑपरेशन टाळून होमिओपॅथिक औषधाने नक्कीच फायदा होतो.

❖ **होमिओपॅथिक औषधे:-**



- **अर्सेनिक अल्बम-**

  - गार वाऱ्यामुळे त्रास होतो
  - नितळ, पाण्यासारखा द्रव नाकातून वाहतो
  - सतत शिंका, नाक बंद होते
  - नाकातून रक्त येते
  - लक्षणवृद्धी - गार हवा, मध्यरात्री, आवाज

- **बेलाडोना-**

  - नाकाच्या शेंड्याच्या ठिकाणी हूळहूळ
  - शेंबूड रक्तमिश्रीत असतो
  - नाकातून रक्त येते
  - नाक लाल व सूजलेले असते
  - डोकेदुखी
  - लक्षणवृद्धी -आवाज, दुपारी झोपल्याने
  - बसल्याने बरे वाटते

- **हेपार सल्फ-**

  - जुनाट सर्दीसाठी उपयुक्त
  - गार वाऱ्यात गेल्याने शिंका वाढतात
  - घट्ट, घाणेरडा वास येणार द्रव नाकातून वाढतो
  - जुन्या चिझसारखा वास असतो
  - लक्षणवृद्धी - गार, थंड हवा
  - कोरड्या हवेत बरे वाटते

- **काली बायक्रोमिकम-**

  - लहान मुलांमध्ये नाक चोंदणे
  - नाकाच्या शेंड्याच्या ठिकाणी दुखते
  - घाणेरडा वास असतो

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a Prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

- हिरवट पिवळा शेंबूड असतो
- शेंबूड घशात उतरतो
- खूप शिंका येतात
- लक्षणवृद्धी -सकाळी
- गरमीमध्ये दाबल्याने बरे वाटते

- **सिलिशिया-**

- सकाळी शिंका येतात
- नाक कोरडे पडते
- वासाची संवेदना कमी होते
- नाक चोंदते
- हात लावला तरी दुखते
- लक्षणवृद्धी - सकाळी, पाळीच्या वेळेस गार हवा
- गरम हवेत डोळे झाकल्याने बरे वाटते

- **साबाडिला-**

- शिंकांबरोबरच नाक वाहते
- नितळ, पातळ पाणी वाहते
- डोळ्यातून पाणी येते
- डोकदुखी
- लक्षणवृद्धी-गार हवा, गार पदार्थ
- उबदार हवेत बरे वाटते

- **सॅम्ब्युकस-**

- लहान मुलांमध्ये नाक चोंदते
- श्वास घेताना त्रास होतो
- डोकेदुखी
- लक्षणवृद्धी -रात्री

- **मर्क्युरियस-**

- उन्हात गेल्यावर शिंका येतात
- हिरवट-पिवळा शेंबूड
- रात्री नाकातून रक्त येते
- नाक हुळहुळते, खाजते
- लक्षणवृद्धी - कोरड्या हवेत, उन्हात

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a Prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

- **नॅट्रम मूर-**

  - नाकातून पाणी येते, श्वास घेताना त्रास होतो.
  - वास व चव कमी होते
  - लक्षणवृद्धी - समुद्राच्या ठिकाणी

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a Prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*